# DRUG AND HEALTH INFORMATION CENTER

IOP-DHIC

# HEALTH NEWSLETTER

18th Issue
JUNE 2020

## हैड्रोक्सईक्लोरोक्विन (Hydroxychloroquine): संजीवनी बुटी ?



Hydroxychloroquine (HCQ) ज्याला आज कोविद-१९ ह्या महामारीने एक वलय प्राप्त केले आहे पण हे वलय प्राप्त होण्यामागे अनेक वर्षयांचा आहे. त्याची मागणी अमेरिकासारख्या बलाढ्य देशापासून तर अविकसित असे अनेक देश करत आहे जर आपण याचा मागोवा घ्यायचा ठरवला तर फार पूर्वी म्हणजे १९६० मध्ये आपल्याला जावं लागेल.

सर्व प्रथम १६३० मध्ये Cinchona बार्क जेसुइट्स कॅथलिक लोकांनी ताप उतरण्यासाठी (Antipyretic) म्हणून केला ,परंतु वाढत्या वसाहतवादामुळे औषधासाठी झाडाच्या सालीवर अवलंबून चालणार नव्हते यातील औषधी गुणधर्माच्या शोधात Pelletier and Caventon यांनी १८२० मध्ये Quinine and Cinchonine याचे मिश्रण औषधी म्हणून वापरण्यास सुरवात केली. इ.सन १९०० सुरवातीस Bayer Pharmaceuticals ने Quinine सारखे साधारम्य असणारे molecules शोधून काढले

एच.सी.क्यु फक्त मलेरिया पुरताच मर्यादित न राहता र्हयूमॅटॉइड अर्थराइटिस, लुपस, पॉर्फिरिया व अँटिकॅन्सर (२०१४ ट्रिअलस ) म्हणून देखील प्रभावीपने अनेक रुग्णांवर वापरला जात आहे म्हणून त्याला आपण संजीवनी बुटी देखील समजू शकतो. आता राहिला त्याचा कोविद १९ मधील वापर त्याबद्दल बोलायचं झालं तर एच.सी.क्यु काही कोविड -१९ या वायरल इन्फेकशन वरचा प्रभावी उपाय म्हणून त्याला मान्यता प्राप्त झालेली नाही परंतु फूड अँड ड्रग (एफडीए) कडून एच.सी.क्यु ला EMERGENCY USE AUTHORIZATION परवानगी मिळाली आहे ज्याचा अर्थ असा कि आपात्कालीन परिस्तिथीमध्ये पूर्व मान्यता प्राप्त औषध काही मोड ऑफ एक्शनसारख्या असल्याने (लैसोसोमोट्रोपिक इफेक्ट) सद्य आपत्कालीन स्तिथीत दिलेली परवानगी असून ज्याचा डॉक्टर, नर्सेस व इतर पॅरामेडिकल स्टाफमध्ये रोग प्रतिबंधक उपचार (prophalaxis) म्हणून दिलेली परवानगी .




दुसऱ्या राष्ट्रांना Hydroxychloroquine निर्यात करण्यात भारत हा मोठा hub असून तो प्रभावी व सक्षम कामगिरी करत आहे. प्रामुख्याने CIPLA, LUPIN, SUN, Dr. Reddy, Sanofi अश्या अनेक जेनेरिक कंपन्या मोठ्या प्रमाणावर औषधी निर्यात करत आहे.

काही लोक डॉक्टरांचा सल्ला न घेता सेल्फ औषधी घेत आहेत, ते धोकादायक ठरू शकते, कारण -

या औषधाचे शरीरावरील काही घातक परिणाम होते जसे की रक्तातील साखर कमी होने, ह्रदयाचे ठोके कमी जास्त होने (Arrhythmia), धडधड इ.

**म्हणून स्वताच्या मर्जीने हे औषध घेऊ नका. घरी राहा, सुरक्षित राहा !**